Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919

तिसऱ्या मुंबईत आणखी ७४ गावे

कर्जत-नेरळमधील ५२ तर अलिबागमधील ३२ गावांचा समावेश

रायगड : पुढारी वृत्तसेवा

मुंबई आणि नवी मुंबईनंतर नियोजीत 'तिसऱ्या मुंबई'च्या कक्षा आणखी रुंदावल्या आहेत. नेरळ, कर्जत आणि अलिबाग परिसरातील नवीन ७४ गावांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे नामकरण 'केएसनी न्यू टाऊन' असे केले असून, या संपूर्ण क्षेत्राचा विकास आता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमएमआरडीए मार्फत केला जाणार आहे.

या विस्तारासह तिसरी मुंबई आता तब्बल ३२४ ते ३७१ चौरस किलोमीटर क्षेत्रात विस्तारणार असून, हे शहर मूळ मुंबईच्या तिप्पट आकाराचे असणार आहे. ऑगस्ट २०२६ पर्यंत या संपूर्ण क्षेत्राचा अंतिम मास्टर प्लॅन (डेव्हलपमेंट प्लॅन) तयार होणार असून ड्रोन आणि 'लिडार' सर्वेक्षणाचे काम गुरुवारेच पूर्ण झाले आहे.

कर्जत-नेरळमधील ५२ आणि अलिबाग-पोयनाडमधील २२ गावांचा नव्याने समावेश केला आहे. नेरळ (मुख्य भाग), ममदापूर, मोहपाडा, बेकरे, बीड, कडाव, डिकसल, वेणगाव, उमरोली, हुमगाव, तसेच माथेरानच्या पायथ्याशी असलेले देवपाडा, वंजारपाडा आणि भूतीवली धरणाजवळील महसूली गावांचा समावेश आहे. कर्जत शहराच्या परिघातील मुळगाव, ढाक, वारे, पाथरज, साळोख, पाली (तर्फे वाशवली), वाशवली, पोशीर, गौरकामत, दहिवली, कोल्हारे आणि कोंढाणे या गावांचा समावेश आहे.

अलिबाग आणि पोयनाड परिसरातील एकूण २२ गावांचा पर्यटन, कोस्टल कनेक्टिव्हिटी आणि व्यावसायिक केंद्र म्हणून विकास करण्यात येणार आहे. पोयनाड परिसरातील पोयनाड (मुख्य बाजारपेठ), पेझारी, शहाबाज (काही भाग), बावे, आंबेपूर, नवखार, वावे, मळघर आणि केळवणे या गावांचा समावेश आहे.अलिबाग शहरालगतच्या ११ गावांचा समावेश आहे. कुरुळ, वरसोली (शहराच्या वेशीवरील भाग), खंडाळा, बामणोली, मापगाव, कार्ले, आगरसुरे, चौल (महसुली भाग), थेरोंडा, आक्षी आणि नागाव या गावांच्या जमिनीचा या नव्या विशेष क्षेत्रात समावेश आहे.

एमएमआरडीएने ४८,७७२.५७ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर केला आहे. यामध्ये तिसऱ्या मुंबईसाठी 'केएसनी न्यू टाऊन'च्या प्राथमिक पायाभूत सुविधांसाठी ४,००० कोटी रुपयांचा निधी थेट राखीव ठेवण्यात आला आहे.

कशी असणार तिसरी मुंबई?

- तिसरी मुंबई केवळ निवासी नसून भारताचे नवे आर्थिक आणि लॉजिस्टिक हब असेल. दळणवळणाचे महाजाळे येथे तयार होत आहे. अटल सेतूमुळे मुंबई ते पिक्नरेन प्रवास अवघ्या २० मिनिटांत शक्य झाला आहे. हाच मार्ग पुढे अलिबाग-विरार मल्टिमोडल कॉरिडोअर आणि मुंबई-पुणे एक्सप्रेसवेला जोडला जात आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जेएनपीए बंदर या शहराच्या अगदी वेशीवर असल्याने येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रे आणि भव्य डेटा सेंटर्स उभारली जाणार आहेत. या ७४ गावांमधील कोणत्याही नवीन बांधकामाची, ले-आउटची किंवा व्यावसायिक प्रकल्पाची मंजुरी आता स्थानिक ग्रामपंचायत किंवा जिल्हाधिकाऱ्यांऐवजी थेट एमएमआरडीए कडून घ्यावी लागणार आहे.

संक्षिप्त

भिवंडी : भिवंडी सह ठाणे व मिरा भाईंदर महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर येथील स्टेम प्राधिकरण जलशुद्धीकरण केंद्रालगत मोकळ्या मैदानात असलेल्या भंगार गोदामास शुक्रवारी सायंकाळी आग लागली होती.

एनआयएचे महाराष्ट्रासह ४ राज्यांतील १२ ठिकाणी छापे

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

भारताच्या सीमेपलीकडून होणाऱ्या शस्त्र तस्करीचे आणि दहशतवादी कारवायांचे मोठे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) शुक्रवारी मोठी कारवाई केली आहे. पाकिस्तानी हस्तक जसवीर चौधरी आणि त्याच्या भारतातील साथीदारांनी पंजाब, दिल्लीसह देशाच्या विविध भागांत आयईडी स्फोट घडवून आणण्याचा मोठा कट रचला होता. या कटात सामील असलेल्या आणि संशयितांना स्थानिक पातळीवर साद पुरवणाऱ्या तसेच मदत करणाऱ्यांच्या ठिकाणांवर 'एनआयए'ने आज पहाटेपासूनच छापे टाकण्यास सुरुवात केली. 'एनआयए'ने उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार आणि महाराष्ट्रातील एकूण १२ वेगवेगळ्या ठिकाणी एकाचवेळी धडक मोहीम राबवत छापासत्र सुरू केले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील २, उत्तर प्रदेशातील २, तर बिहार आणि राजस्थानमधील प्रत्येकी २ ठिकाणांचा समावेश आहे. संशयितांकडून मिळालेल्या ठोस माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात येत आहे. सीमाभागात ड्रोनद्वारे शस्त्र तस्करीच्या या नवीन प्रकारामुळे सुरक्षा यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

अवसायनातील १,३२० दूध संस्थांचा सोमवारी फुटणार 'बॉम्ब'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

'गोकुळ' संलग्न अवसायन प्रक्रियेतील १,३२० दूध संस्थांचा 'बॉम्ब' सोमवारी फुटणार आहे. यामधील किती संस्था मतदानास पात्र ठरणार आणि अपात्र ठरणार याची स्पष्टता मिळणार आहे. सुनावणी पूर्ण झालेल्या संस्थांचे निकाल तयार करण्याचे काम सहायक निबंधक (दूध) कार्यालयात सुरू झाले आहे. सहायक निबंधक कृष्णा ठाकरे अवसायनातील दूध संस्थांचा निकाल देतील. 'गोकुळ'ने ५,४७० संस्था समासदांची मतदारयादी सहायक निबंधक कार्यालयाकडे सादर केली होती. यामधील १,३२० दूध संस्थांवर तक्रारदार प्रकाश बेलवाडे यांनी आक्षेप घेत न्यायालयात धाव घेतली. न्यायालयात चाललेल्या सुनावणीमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने अवसायनातील १,३२० दूध संस्थांची सुनावणी प्रक्रिया पूर्ण करून संस्था पात्र-अपात्रचा निर्णय घ्या, ही सर्व प्रक्रिया ८० दिवसांत पूर्ण करा, असा आदेश दिला. त्यानुसार अवसायनातील दूध संस्थांची सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, केवळ ५० दूध संस्थांची सुनावणी बाकी आहे.

यूपीएससीकडून तुम्ही काही गोष्टी शिकाव्यात

सर्वोच्च न्यायालयाने 'एनटीए'ला फटकारले

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या म्हणजेच यूपीएससीच्या परीक्षांत कधीच पेपरफुटीची समस्या निर्माण झाली नाही. त्यामुळे तुम्ही त्यांच्याकडून काही गोष्टी शिकण्याची गरज आहे, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नॅशन टेस्टिंग एजन्सीला फटकारले.

सर्वोच्च न्यायालयाने पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित याचिकांवर सुनावणी केली. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत जेणेकरून कोणतीही चूक होऊ नये.

यावर सर्वोच्च न्यायालयाने सांगितले, अशा प्रकरणांमध्ये जोपर्यंत जबाबदारी निश्चित केली जात नाही, तोपर्यंत या घटना थांबणार नाहीत. यूपीएससीमध्ये अशी समस्या कधीच आली नाही.

प्रकरणाची सुनावणी करणारे न्यायमूर्ती नरसिम्हा यांनी शिक्षण मंत्रालयाकडून एनटीएच्या परीक्षांच्या तपास प्रक्रियेचा तपशील मागवला आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने सांगितले की, पेपरफुटीनंतर मोठ्या प्रमाणावर सुरक्षा सुधारणा केल्या आहेत.

दरम्यान, देशभरात ३ मे रोजी - परीक्षा झाली होती. ७ मे रोजी संध्याकाळी पेपरफुटीची बातमी समोर आली होती. १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्यात आली. आता २१ जून रोजी पुन्हा परीक्षा घेतली जाईल.

तंबाखूमुक्त लढाईत 'बेस्ट' ठरली बेस्ट

२०१४ पासून पाच हजारांहून अधिक कर्मचारी झाले व्यसनमुक्त

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

२०१४ पासून 'तंबाखूमुक्त बेस्ट अभियान'अंतर्गत ५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांनी तंबाखूचे व्यसन सोडले असून शुक्रवारी जागतिक तंबाखू मुक्त दिनानिमित्त इलेक्ट्रिक हाऊस येथे या व्यसनमुक्त बेस्ट कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

नियमित आरोग्य तपासणी, समुपदेशन, जनजागृती आणि 'मंजिक मिक्स' या निकोटीनमुक्त पर्यायाच्या मदतीने हे मोठे यश मिळाल्याचा दावा यावेळी बेस्ट प्रशासनाने केला असून याचा परिणाम म्हणून तंबाखूजन्य आजार, गैरहजेरी आणि उपचार खर्चात घट झाल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमात बेस्ट समिती सदस्य सुनील गणाचार्य, रमाकांत गुप्ता, अभिनेत्री नीतू चंद्रा, अमृता गवळी तसेच बेस्टचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुंबई : जागतिक तंबाखूमुक्त दिननिमित्ताने कॅन्सर पेशंट्स एई असोसिएशन तर्फे आयोजित 'तंबाखूमुक्त बेस्ट' मोहिमेत बेस्टची (बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट) डँडे अँम्बेसेडर अभिनेत्री नीतू चंद्रा आणि इतर मान्यवर सहभागी झाले होते.

या अभियानाअंतर्गत कर्मचाऱ्यांमध्ये नियमित जनजागृती केली जाते. तसेच तंबाखू सेवन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची कार्यस्थळी जाऊन तोंडाच्या आरोग्याची तपासणी आणि इतर आजारांचे स्क्रीनिंग केले जाते. बेस्टच्या व्यसनमुक्ती केंद्रात समुपदेशन आणि उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तंबाखूजन्य गंधीर आजारांनी ग्रस्त कर्मचाऱ्यांना वेतनासह रजा आणि आर्थिक मदतही दिली जात असल्याचे यावेळी बेस्टचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल सिंघल यांनी सांगितले.

कोटपा कायद्यांतर्गत कठोर बंदी

- डॉ. सिंघल यांनी सांगितले की, कोटपा कायद्यांअंतर्गत बेस्टच्या बस, कार्यालये, आगार आणि कर्मचारी वसाहतींमध्ये तंबाखू सेवन व प्रचाराबद्दल पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. धुंकण्यावरही विशेष निर्बंध लागू करण्यात आले आहेत. 'मंजिक मिक्स' हा निकोटीनमुक्त आणि सुरक्षित पर्याय व्यसनमुक्ती मोहिमेतील महत्त्वाचा टप्पा ठरला असून अनेक कर्मचाऱ्यांना तंबाखू सोडण्यात त्याचा फायदा झाल्याचे प्रशासनाने सांगितले.

वायफाय अपडेटच्या बहाण्याने वृद्ध वकिलाची फसवणूक

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

वायफाय अपडेटच्या बहाण्याने एका वयोवृद्ध वकीलाला एपीके फाईल पाठवून सायबर ठगाने त्यांची ९ लाख ९ हजारांची फसवणूक केल्याचा प्रकार मालाड परिसरात उघडकीस आला आहे.

याप्रकरणी बांगुनगर पोलिसांनी अज्ञात सायबर ठगाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. ६६ वर्षांचे तक्रारदार मालाड येथे राहत असून एका खासगी कंपनीतून निवृत्त झाले आहेत. सध्या ते एका लॉ फर्ममध्ये वकील म्हणून काम पाहतात. त्यांच्या घरी एका खासगी कंपनीचे डीटीएच टिव्ही आणि वायफाय कनेक्शन आहे. २३ मे रोजी त्यांच्या मोबाईलवर ऑफरचा मॅसेज पाठविल. त्यांनी ती ऑफर घेण्याचा विचार केला होता. त्याचदिवशी त्यांच्या घरी कंपनीचा एक कर्मचारी आला आणि त्याने नवीन मोडेम आणि राऊटर बसवून नवीन वायफाय आयपी टिव्ही कनेक्शन सुरू केला होता. मात्र त्यांच्या लॅपटॉपवर वायफाय कनेक्ट झाला नव्हता. त्यामुळे त्यांनी तक्रार केली होती. यावेळी कंपनीच्या कर्मचाऱ्याने एअर फायबर अपग्रेड नसल्याने ही समस्या येत असल्याचे सांगितले. याच दरम्यान त्याने त्यांना एक एपीके फाईल पाठविली. ही फाईल मोबाईलवर ओपन करुन त्यांनी वायफाय अपग्रेड करण्याची विनंती पाठविली. या विनंतीनंतर एक तासभर अपडेडिंग सुरू होते, मात्र मोबाईलचा चार्जिंग संपल्याने त्यांचा मोबाईल बंद झाला होता. काही वेळानंतर त्यांनी मोबाईल सुरू केला. यावेळी त्यांना त्यांच्या बँक खात्यासह डेबीट आणि क्रेडिट कार्डवरुन काही ऑनलाईन व्यवहार झाल्याचे दिसून आले. अज्ञात व्यक्तीने वायफाय अपडेट करण्याचा बहाणा करून त्यांना एपीके फाईल पाठविली. ही फाईल ओपन होताच त्याने त्यांच्या मोबाईलचा ॲसेस घेऊन मोबाईलवरुन बँक खात्यासह डेबीट, केडीट्ढारे ९ लाख ९ हजार ७७४ रुपयांची आर्थिक फसवणूक केली होती.

हा प्रकार लक्षात येताच त्यांनी सायबर हेल्पलाईनसह बांगुरनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर संबंधित सायबर ठगाविरुद्ध पोलिसांनी फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यांत संबंधित व्यक्ती कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय तक्रारदारांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यांना कॉल करणाऱ्या व्यक्तीची माहिती काढण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सर येते धावून... पण पाऊस जातो वाहून!

पावसाचे प्रमाण ११ हजार ६५४ टीएमसी; साठवण क्षमता मात्र १,७१५ टीएमसी

कोल्हापूर : सुनील कदम

राज्यात सरासरी दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे प्रमाण तब्बल ११ हजार ६५४ टीएमसी इतके आहे; पण राज्यातील सर्व धरणांची मिळून पाणी साठवण क्षमता फक्त १,७१५ टीएमसी इतकीच आहे. परिणामी, पावसाचे बाकीचे सगळे पाणी वाहून जाते.

मुंबई व उपनगरे वगळता राज्यातील उर्वरित ३५५ तालुक्यांमध्ये सरासरी ८६.४० टक्के पर्जन्यवृष्टी होते. त्यापैकी १९ तालुक्यांमध्ये अतिवृष्टी, ९९० तालुक्यांमध्ये सरासरी पाऊस पडतो, तर १४५ तालुक्यांमध्ये अल्पवृष्टी होते. राज्यात संपूर्ण मान्सून काळात सरासरी पर्जन्यवृष्टी ९,७५५ मिलिमीटर इतकी होते. दहा-बारा वर्षांतील एखादे वर्ष वगळता महाराष्ट्राला जळपास ३३० लाख कोटी लिटर पाणी निसर्ग पावसाच्या रूपाने दरवर्षी देतोय देतो. (३३० लाख कोटी लिटर म्हणजे ११ हजार ६५४ टीएमसी) मात्र राज्यातील ३,०२८ धरणांची एकूण जलसाठा क्षमता केवळ १,७१५ टीएमसी इतकीच आहे. पावसाचे पडणारे उर्वरित ९,९३० टीएमसी पाणी समुद्राकडे किंवा अन्य राज्यांत वाहून जाते. हे पाणी उडवून त्याची साठवणूक करण्याचे कोणतेही नियोजन सध्या तरी राज्य शासनाकडे असलेले दिसत नाही. म्हणजेच, स्वातंत्र्यानंतर आजअखेर दरवर्षी पडणाऱ्या पावसापैकी फक्त १४.७१ टक्के पाणी साठवण्याची कामगिरी महाराष्ट्राला करता आली आहे.

उपलब्धता आणि वापरातील विसंगती

- राज्यात दरवर्षी पावसाच्या पाण्यासह उपलब्ध होणाऱ्या ५,१५८ टीएमसी पाण्यापैकी २,१६६ टीएमसी पाण्याचा वापर होतो, याचा अर्थ राज्याकडे अजूनही २,१९२ टीएमसी पाणी शिल्लक आहे, असा गैरसमज होणे शक्य आहे; पण राज्यात नदी, नाले-ओढे, तलावांसह असे काही पाण्याचे नैसर्गिक स्रोत आहेत, जे इतके प्रदूषित झाले आहेत की, त्या पाण्याचा कोणत्याही कारणासाठी वापर घातक बनला आहे. त्यामुळे राज्यात आवश्यकतेपेक्षा जवळपास २,१९२ टीएमसी जादा पाण्याची उपलब्धता असूनही राज्यातील १७३ तालुके म्हणजेच जवळपास ५० टक्के क्षेत्र अजूनही दुष्काळी आहे. याबाबी पाण्याची उपलब्धता आणि वापरातील विसंगती स्पष्ट करतात.



पाण्याची वार्षिक उपलब्धता आणि वापर (टीएमसीमध्ये)

- भूपृष्ठावर उपलब्ध : ३,८४२
- परराज्यांतून मिळणारे : ३७८
- भूजलाची उपलब्धता : ७७३
- एकूण वार्षिक उपलब्धता : ५,१५८
- वार्षिक घरगुती वापर : २७०
- औद्योगिक वार्षिक वापर : १०.८२
- सिंचनासाठी वार्षिक वापर : २,०९६
- परराज्यांना दरवर्षी द्यायचे : ५१०

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया

एसआयआयडी : ११९६७, स्ट्रेन्थ ॲनेक्स विकव्हरी ब्रँच, १ला मजला, प्लॉट क्र. ९-१२२, सर्वेक्षण रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम), ४००६०४, ई-मेल : sbi.11697@sbi.co.in

परिशिष्ट - IV A स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना नियम (८(६) च्या तरतुदी पाहा)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या ॲनेक्चर स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस, जी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००३ च्या नियम ८(६) च्या तरतुदीच्या बाबतीत जारी आहे.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित असलेली खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जिचा **भौतिक ताबा** एटेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती "जेथे आहे, "जसे आहे आणि "जे काही आहे तेथे" या तत्त्वावर ३०.०६.२०२६ रोजी विकली जातील. ही विक्री **श्री. रवन भालचंद्र बिसाळ आणि श्रीमती नीरजा रवन बिसाळ** यांच्या कर्जाच्या रु. ९६,७५,०२४/- (पर्यायाने **अठ्ठाऐंशी लाख दोन हजार तीनशे एकोणसाठ फक्त**) या धनकोच्या आणि त्यानंतरच्या व्याज व आनुषंगिक खर्च आणि वसूलीसाठी केली जात आहे.

राखीव मूल्य रु. ७,७०,०००/- (**पाच लाख एकोणसाठ हजार फक्त**) अनेत आणि बयाणा रक्कम रु. ७,७०,०००/- (**पाच लाख सत्तर हजार फक्त**) अनेत.

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या अवलोकने घेणे, मालमत्तेचे हक्क, सोयमत्ता/बिल्डरची देणी या संदर्भातील स्वबळे घ्यावे चौकशी करावी. या संदर्भातील ई-लिलाव जाहिरात ही बँकेची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व दर्शवत नाही आणि तसे मानले जाणार नाही.

बोलीदारांनी लिलावाच्या तारीखेपूर्वी अवगत केलेली कागदपत्रे आणि चौकशी शुल्क देऊन मेसर्स पीरामल अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रमाणित पद्धतीनुसार (**https://baanknet.com**) या वेबसाइटवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक ई-लिलावाची तारीख आणि वेळ **३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत** प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारण्याच्या अटीसह.

मालमत्तेच्या तपशील

फ्लॅट नं. १२, क्षेत्रफळ ४८० चौ. फूट (बिल्ट अप), ४ था मजला, बिल्डिंग लक्ष्मी नारायण को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लि., पुर्वी-आता रोड, ठाणे (पश्चिम), ४००६०१, ही मालमत्ता सी. एस. पाराण्ड्या मिसाळ आणि श्रीमती नंदिनी रवन बिसाळ यांच्या नावावर आहे.

राखीव किंमत (रु.)	इसारा रक्कम देय (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	लयलामीची तारीख आणि वेळ
७५,००,०००.००	७,५०,०००.००	१,००,०००.००	सकाळी १९.०० ते दुपारी २.०० पर्यंत

लिलाव तपशीलवार शर्ती आणि अटींसाठी कृपया एटेट बँक ऑफ इंडिया, सिक्युरर्ड क्रेडीट योजना वेबसाइट www.sbi.co.in, **https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction - notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanknet.com** मध्ये असलेली लिंक पहा किंवा संपर्क करा

श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, मोबाइल नो. क्र. ७८७५५५९६६ आणि

श्री. अमित एम. साठे, मोबाइल नो. क्र. ९८३४९३७००१

स्वाक्षरी/-
चंद्रकुमार डी. कांबळे
प्राधिकृत अधिकारी,
स्टेट बँक ऑफ इंडिया.

दिनांक : २९.०५.२०२६
ठिकाण : ठाणे

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया

एसआयआयडी : ११९६७, स्ट्रेन्थ ॲनेक्स विकव्हरी ब्रँच, १ला मजला, प्लॉट क्र. ९-१२२, सर्वेक्षण रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम), ४००६०४, ई-मेल : sbi.11697@sbi.co.in

परिशिष्ट - IV A स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना नियम (८(६) च्या तरतुदी पाहा)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या ॲनेक्चर स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस, जी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००३ च्या नियम ८(६) च्या तरतुदीच्या बाबतीत जारी आहे.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित असलेली खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जिचा **भौतिक ताबा** एटेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती "जेथे आहे, "जसे आहे आणि "जे काही आहे तेथे" या तत्त्वावर ३०.०६.२०२६ रोजी विकली जातील. ही विक्री **श्री. अभय मारोतीराव दुदुकवार आणि श्रीमती वैशाली अभय दुदुकवार** यांच्या कर्जाच्या रु. २१.०५.२०२४ पर्यंतच्या रु. ३९,१६१/- (**पाच एकोणचाळीस लाख त्राहत्तरशत हजार एकशे चौसष्टीस मात्र**) या धनकोच्या आणि त्यानंतरच्या व्याज व आनुषंगिक खर्च आणि वसूलीसाठी केली जात आहे.

राखीव मूल्य रु. ५६,००,०००/- (**पन्नास हजार मात्र**) अनेत आणि बयाणा रक्कम रु. ५,६०,०००.०० (**पाच लाख साठ हजार मात्र**) अनेत.

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या अवलोकने घेणे, मालमत्तेचे हक्क, सोयमत्ता/बिल्डरची देणी या संदर्भातील स्वबळे घ्यावे चौकशी करावी. या संदर्भातील ई-लिलाव जाहिरात ही बँकेची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व दर्शवत नाही आणि तसे मानले जाणार नाही.

बोलीदारांनी लिलावाच्या तारीखेपूर्वी अवगत केलेली कागदपत्रे आणि चौकशी शुल्क देऊन मेसर्स पीरामल अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रमाणित पद्धतीनुसार (**https://baanknet.com**) या वेबसाइटवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक ई-लिलावाची तारीख आणि वेळ **३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत** प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारण्याच्या अटीसह.

मालमत्तेच्या तपशील

फ्लॅट नं. ३२, क्षेत्रफळ सुमारे ८८० चौ. फूट बिल्ट-अप एरिया, तिसरा मजला, इमारत जिना क्रमांक आयडीएल को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट नंबर २३२, दुसरीवाडा (जी.टी.एस.), सेक्टर-२३, खारगवा गाव, नवी मुंबई, तालुका व जिल्हा ठाणे - ४००७०५, ही मालमत्ता श्री. ओम मारोतीराव दुदुकवार आणि श्रीमती वैशाली ओम दुदुकवार यांच्या नावावर आहे.

राखीव किंमत (रु.)	इसारा रक्कम देय (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	लयलामीची तारीख आणि वेळ
५६,००,०००.००	५,६०,०००.००	१,००,०००.००	सकाळी १९.०० ते दुपारी २.०० पर्यंत

लिलाव तपशीलवार शर्ती आणि अटींसाठी कृपया एटेट बँक ऑफ इंडिया, सिक्युरर्ड क्रेडीट योजना वेबसाइट www.sbi.co.in, **https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction - notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanknet.com** मध्ये असलेली लिंक पहा किंवा संपर्क करा

श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, मोबाइल नो. क्र. ७८७५५५९६६ आणि

श्री. अमित एम. साठे, मोबाइल नो. क्र. ९८३४९३७००१

स्वाक्षरी/-
चंद्रकुमार डी. कांबळे
प्राधिकृत अधिकारी,
स्टेट बँक ऑफ इंडिया.

दिनांक : २९.०५.२०२६
ठिकाण : ठाणे

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया

एसआयआयडी : ११९६७, स्ट्रेन्थ ॲनेक्स विकव्हरी ब्रँच, १ला मजला, प्लॉट क्र. ९-१२२, सर्वेक्षण रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम), ४००६०४, ई-मेल : sbi.11697@sbi.co.in

परिशिष्ट - IV A स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना नियम (८(६) च्या तरतुदी पाहा)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या ॲनेक्चर स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस, जी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००३ च्या नियम ८(६) च्या तरतुदीच्या बाबतीत जारी आहे.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारित असलेली खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जिचा **भौतिक ताबा** एटेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती "जेथे आहे, "जसे आहे आणि "जे काही आहे तेथे" या तत्त्वावर ३०.०६.२०२६ रोजी विकली जातील. ही विक्री **श्री. अक्षय विलास शेरखे** यांच्या कर्जाच्या रु. २२,१७,७३६/- (**पंचवीस हजार सातशे सत्तेचाळीस फक्त**) या धनकोच्या आणि त्यानंतरच्या व्याज व आनुषंगिक खर्च आणि वसूलीसाठी केली जात आहे.

राखीव मूल्य रु. २६,००,०००/- (**पंचवीस लाख साठ हजार फक्त**) अनेत आणि बयाणा रक्कम रु. २,६०,०००/- (**दोन लाख साठ हजार फक्त**) अनेत.

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या अवलोकने घेणे, मालमत्तेचे हक्क, सोयमत्ता/बिल्डरची देणी या संदर्भातील स्वबळे घ्यावे चौकशी करावी. या संदर्भातील ई-लिलाव जाहिरात ही बँकेची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व दर्शवत नाही आणि तसे मानले जाणार नाही.

बोलीदारांनी लिलावाच्या तारीखेपूर्वी अवगत केलेली कागदपत्रे आणि चौकशी शुल्क देऊन मेसर्स पीरामल अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रमाणित पद्धतीनुसार (**https://baanknet.com**) या वेबसाइटवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक ई-लिलावाची तारीख आणि वेळ **३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत** प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारण्याच्या अटीसह.

मालमत्तेच्या तपशील

फ्लॅट नं. ०, तुळशा मजला, विंग डी, पाम गार्डन, सर्व्हे नं. १७/१/केन, गुंजेरे रोड, गुरु प्रेरणा कॉम्प्लेक्स म्हणजेच गार्डे, पे. कडक, किसा गावाजवळ - ४१०८२१, कल्याण ८१० चौ. फूट (बिल्ट-अप), श्री. राहुल विलास खरात आणि श्रीमती अलका राहुल खरात यांच्या नावावर.

राखीव किंमत (रु.)	इसारा रक्कम देय (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	लयलामीची तारीख आणि वेळ
रु. १९,०४,०००.००	रु. १,९०,०००.००	२५,०००.००	सकाळी ११.०० ते दुपारी २.०० पर्यंत

लिलाव तपशीलवार शर्ती आणि अटींसाठी कृपया एटेट बँक ऑफ इंडिया, सिक्युरर्ड क्रेडीट योजना वेबसाइट www.sbi.co.in, **https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction - notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanknet.com** मध्ये असलेली लिंक पहा किंवा संपर्क करा

श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, मोबाइल नो. क्र. ७८७५५५९६६ आणि

श्री. अमित एम. साठे, मोबाइल नो. क्र. ९८३४९३७००१

स्वाक्षरी/-
चंद्रकुमार डी. कांबळे
प्राधिकृत अधिकारी,
स्टेट बँक ऑफ इंडिया.

दिनांक : २९.०५.२०२६
ठिकाण : ठाणे

**SBI स्टेट बँक ऑ